**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ६८/२०१२ मधील नि.क्र. ३८४ खाली आदेश</u>**

**<u>(सुर्यकांत सुतार वि. शरद जाधव)</u>**

**<u>(CNR No. MHSN020007952012)</u>**

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

२. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास येते की मुळ दावा हा खरेदीपत्र रद्द होऊन मिळण्याकरीता आणि निरंतर ताकीद मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण आजरोजी वादीच्या उलटतपासाकरीता नेमण्यात आलेले होते. परंतु वारंवार पुकारा करुनही प्रतिवादी क्रमांक ७ व ८, तसेच वकील हजर राहिले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ७ व ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता, दोन्ही पक्षांना पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्यात कायदेशीर गुंतागुंत न वाढता प्रकरण निकाली काढण्यास न्यायालयास मदतच होईल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, आदेश खालीलप्रमाणे

**:: <u>आदेश</u> ::**

अर्ज निशाणी क्रमांक ३८४ मंजुर करण्यात येतो.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2024.07.25 16:53:31 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)
दि. २२/०७/२०२४ २रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.